922

# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

---

वाचा :- १) महाराष्ट्र देशी दारू नियम १९७३ मधील उपननियम ६(२४).
२) महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अॅण्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स १९६६ मधील उपनियम १७(२४).
३) महाराष्ट्र मॅन्युफॅक्चर ऑफ बियर अॅण्ड वाईन रुल्स १९६६ मधील उपनियम ११ (५).
४) महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियमावली १९६३ मधील उपनियम ९ (ब).

---

## परिपत्रक

क्रमांक:- एमआयएस ११२०१८/१२७२/५-ब, मुंबई, दि. १९ मार्च, २०१९.

विषय :- भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांच्या दि.१९ मार्च २०१८ रोजीच्या अधिसुचनेन्वये मद्यांच्या लेबलवर छापावयाच्या मजकुराबाबत.

महाराष्ट्र देशी मद्य निर्मिती नियम, १९७३ च्या नियम ६ (२४), महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अॅण्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर नियम, १९६६ च्या नियम १७ (२४) आणि महाराष्ट्र बिअर अॅण्ड वाईन निर्मिती नियम, १९६६ च्या नियम ११ (५) मधील तरतुदीनुसार नुसार राज्यात उत्पादीत होणाऱ्या अनुक्रमे देशी मद्य, विदेशी मद्य आणि बियरच्या बाटल्यांवर लावण्यात येणाऱ्या लेबलवर छापण्यात येणाऱ्या मजकुराबाबतच्या सूचना विहित केलेल्या आहेत. सदर सुचनांचे तसेच याबाबत या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या परिपत्रकीय सुचनांचे पालन राज्यातील सर्व मद्य, बियर, वाईन उत्पादकांनी करणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) च्या दि.१९ मार्च २०१८ रोजीच्या अधिसुचनेन्वये अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (अल्कोहोलिक पेय) नियम २०१८ संपुर्ण देशात दि.०१ एप्रिल २०१९ पासून लागू होणार असून त्यानुसार मद्यांच्या बाटल्यावर चिटकविण्यात येणाऱ्या लेबल्सवर वैधानिक इशारा व इतर मुद्रीत करावयाच्या बाबी विषयी निर्देश दिले आहेत. सदरचे निर्देश हे राज्यातील सर्व मद्य, बियर, वाईन उत्पादकांना तसेच परदेशातून व परराज्यातून मद्य आयात करणाऱ्या घटकांना लागू असून त्यानुसार त्यांना त्यांच्या मद्याच्या ब्रॅण्डच्या लेबलमध्ये बदल करणे बंधनकारक आहे. सदरची अधिसुचना यासोबत जोडण्यात येत आहे. याबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत-

२. विदेशी मद्यांच्या बाटल्यांवर चिटकविण्यात येणाऱ्या लेबल्सवर खालीलप्रमाणे चौकटीमध्ये वैधानिक इशारा मुद्रीत करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| **CONSUMPTION OF ALCOHOL IS INJURIOUS TO HEALTH.<br>BE SAFE - DON'T DRINK AND DRIVE.** |

२. तर देशी मद्यांच्या बाटल्यांवर चिटकविण्यात येणाऱ्या लेबल्सवर खालीलप्रमाणे चौकटीमध्ये वैधानिक इशारा मुद्रीत करणे आवश्यक आहे.

| |
|---|
| **मद्य सेवन हे आरोग्यास हानिकारक आहे.**<br>**सुरक्षित रहा - मद्य सेवन करून वाहने चालवू नका.** |

३. अ) सुमारे २०० मि.ली. पेक्षा कमी क्षमता असलेल्या मद्याच्या बाटलीवर चिटकविण्यात येणाऱ्या लेबल्सवरील वरील वैधानिक इशाऱ्याच्या अक्षराचा आकार १.५ मिमि पेक्षा कमी नसेल.

ब) सुमारे २०० मि.ली. पेक्षा जास्त क्षमता असलेल्या मद्याच्या बाटलीवर चिटकविण्यात येणाऱ्या लेबल्सवरील वरील वैधानिक इशाऱ्याच्या अक्षराचा आकार ३ मिमि पेक्षा कमी नसेल.

४. वरील सुधारीत नवीन लेबलचा वापर दि. ०१ एप्रिल २०१९ पासून करणे बंधनकारक राहील. घटकाला जुने लेबल्सचा वापर दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत करता येईल. या तारखेनंतर घटकाला कोणत्याही परिस्थितीमध्ये जुने लेबल वापरता येणार नाही.

५. यापुर्वी या कार्यालयाने मंजुरी दिलेल्या ब्रॅण्डच्या लेबल्समध्ये वरील भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) च्या अधिसुचनेन्वये होणाऱ्या बदलाबाबतचे लेबल मंजूर करण्याचे अधिकार संबंधीत अधीक्षकांना देण्यात येत आहेत.

६. वरील बदलामुळे घटकाने सादर केलेले लेबल्स मंजूर करतांना अधीक्षकांनी सदरचे लेबल्स यापुर्वी या कार्यालयाने मंजूर केलेल्या मुळ लेबल्सशी प्रत्यक्ष पडताळणी करून मंजुरीची कार्यवाही करावी. <u>वरील बदलाशिवाय लेबल्समध्ये इतर कोणतेही बदल असल्यास असे लेबल्स मंजूर करण्यात येवू नयेत.</u>

७. घटकांना यापुर्वी त्यांना मंजूर असलेल्या ब्रॅण्डच्या लेबल्समध्ये वरीलप्रमाणे बदल करून नवीन लेबल्स संबंधीत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडून दि. ३० एप्रिल २०१९ पर्यंत मंजूर करून घेण्याची जबाबदारी घटकाची असेल. तसेच दि. ३० एप्रिल २०१९ नंतर अशा प्रकारे प्राप्त झालेले लेबल्स अधीक्षकांना मंजूर करता येणार नाहीत.

८. घटकाकडून वरील बदल करून लेबल्स मंजुरीबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर अधीक्षकांनी लवकरात लवकर कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाची सर्व अधीक्षकांनी पोच द्यावी.

( प्राजक्ता लवंगारे-वर्मा )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क

४) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१ आणि एफएल-१ अनुज्ञप्तीवरील प्रभारी अधिकारी.
५) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१, 'K' प्रमाणपत्र आणि एफएल-१ अनुज्ञप्तीधारक
६) या कार्यालयातील कार्यासन क्र. ८ (कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता)
७) अभिलेख शाखा (५प्रती)